**प्रेस नोट** दिनांक. २१/०४/२०२२

**आरोपी लोकसेवक मुस्तफा जलील सयद, पोलीस शिपाई बं.न.९०४, नेमणुक पो.स्टे पाथरी रा. सातोना ता.परतूर जि.जालना ह.मु. फक्राबाद मोहल्ला पाथरी यांनी ३०००/— रू लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | परभणी. |
| पोलीस स्टेशन | पाथरी |
| गुन्हा नोंद व कलम | गु.र.नं.१७५/२०२२, क. ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | मुस्तफा जलील सयद, पोलीस शिपाई बं.न.९०४, नेमणुक पो.स्टे पाथरी रा. सातोना ता.परतूर जि.जालना ह.मु. फक्राबाद मोहल्ला पाथरी ता. पाथरी जि. परभणी (वर्ग—३) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०००/— रू. ( तीन हजार रूपये ) |
| थोडक्यात माहीती | सदर प्रकरणात तक्रारदार यांनी लाप्रवि परभणी येथे दि.१८/०४/२०२२ रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, मागील पाच महिण्या पासुन त्यांनी मटका चालु केला होता आता दोन आठवडे पासुन बंद आहे. तक्रारदार हे कामानिमित्त बाहेरगावी असताना आलोसे यांनी फोन करुन तक्रारदार यांचा मित्र आलीम शेख यास पकडले असुन त्याचे मोबाईलमध्ये आलीमने व तक्रारदार यांनी चालवलेल्या मटक्याचे आकडे मिळाले असुन तक्रारदार व त्याचा मित्रावर मटक्याचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व पुढे त्यांना आणि त्यांचे मित्राला मटका चालवु देण्यासाठी ५,०००/— रूपये लाचेची मागणी करत आहे. तरी त्यांनी स्वत: किंवा इतरा मार्फत लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.<br>दि.१८/०४/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांनी पंच क्र.१ यांचे समक्ष कृर्शी उत्पन्न बाजार समिती पाथरी परीसरात आलोसे मुस्तफा जलील सयद, पोलीस शिपाई बं.न.९०४, नेमणुक पो.स्टे पाथरी यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरूध्द तसेच त्यांचे मित्राचे विरुध्द मटक्याचा गुन्हा दाखल न करण्यासाठी आणि तक्रारदार यांना पुढे मटका चालवु देण्यासाठी ३,०००/—रू लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून दि.२०/०४/२०२२ रोजी करण्यात आलेल्या सापळापुर्व व सापळा कार्यवाही दरम्यान पाथरी येथील माजलगाव ते पाथरी रोडलगत असलेल्या शबनम हॉटेल समोरील पानपट्टीचे समोर आरोपी लोकसेवक आलोसे मुस्तफा जलील सयद, पोलीस शिपाई बं.न.९०४ यांनी तक्रारदार यांचे कडुन लाचेची रक्कम ३०००/— रू स्विकारून स्वत:चे अंगावरील शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली त्यावेळेस त्यांना लाचेची रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले. त्यावरून आलोसे मुस्तफा जलील सयद, पोलीस शिपाई बं.न.९०४, नेमणुक पो.स्टे पाथरी यांचे विरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. |

सदरची कार्यवाही मा.डॉ.श्री.राहुल खाडे, पोलीस अधिक्षक, लाप्रवि औरंगाबाद परिक्षेत्र अतिरीक्त कार्यभार नांदेड परिक्षेत्र, नांदेड व मा. धरमसिंह चव्हाण, अपर पोलीस अधिक्षक, लाप्रवि नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक, श्रीमती स्वप्नाली धुतराज पोलीस निरीक्षक, श्री सदानंद वाघमारे पोलीस निरीक्षक, पोह/मिलींद हनुमंते, पोना/अनिल कटारे, पोना/ सचिन धबडगे, पोशि शेख मुक्तार, चापोना/ जर्नाधन कदम अे.सी.बी. परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२—२२०५९७ टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID -** dyspacbparbhani@gmail.com

डॉ.श्री.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड — ८८८८८०७२९९

श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नांदेड — ९९२३४१७०७६

श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी. — ७०२०२२४६३१

श्री सदानंद वाघमारे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी — ९८२३६१६१४२

श्रीमती, स्वप्नाली धुतराज, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी — ९५०३०६९३३९